Golden Research Thoughts
Volume-3, Issue-5, Nov-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# आधुनिक मराठी कवितेचे जनक– कवी केशवसुत

**किरण नामदेव पिंगळे**
सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक

***सारांश:*** आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक, आधुनिक मराठी कवितेचे जनक, एक क्रांतीकारक कवी म्हणून कवी कृष्णाजी केशव दामले यांना ओळखले जाते. कोकणातील रत्नागिरीसारख्या निसर्गरम्य परिसरातील 'मालगुंड' या लहानशा खेडयात केशवसूतांचा जन्म झाला. खानदेशातील 'काव्यरत्नावली' या नियतकालीकाचे संपादन करीत असलेले नारायण नरसिंह फडणीस यांनी केशवसुतांच्या कविता 'केशवसुत' या नावाने प्रसिध्द करण्यास सुरूवात केली. तेंव्हापासून 'कृ. दे. दामले' या नावाऐवजी 'केशवसुत' हयाच नावाने ते प्रख्यात झाले. 'मालगुंड' या आपल्या जन्मगावी केशवसुत फार काळ राहिले नाही. दापोली तालुक्यातील 'वळणे' या गांवी केशवसुतांचे बरेचसे बालपण गेले. खेड, बडोदे, वर्धा, नागपूर, पुणे अशा ठिकाणी त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. विद्यार्थिदशेतच केशवसुतांनी आपल्या काव्यलेखनास प्रारंभ केला होता. केशवसुतांना चित्रकलेचीदेखिल विशेष आवड होती. शिक्षण घेत असतानाच 1880 मध्ये त्यांचा विवाह झाला. 1889 साली ते मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर त्यांनी मुंबई, सावंतवाडी, भडगाव, फैजपूर व धावाड अशा अनेक ठिकाणी नोकरी केली. केशवसुतांचा बराचसा काळ हा शिक्षकी पेशात गेला.

***प्रस्तावना:***

इंग्रजीतील स्वच्छंदतावादी वर्डस्वर्थ, कीटस, शेले, एडगर ॲलन पो आणि वाल्डोइमर्सन या कविंक्ष्या कवितेचा केशवसुतांवर प्रभाव पडला. या कविंचे काव्य त्यांना प्रेरक वाटले. तसेच ह. ना. आपटे, कवी माधवानुज, काशीनाथ रघुनाथ मित्र, कवी विनायक, नरहर शंकर रहाळकर, कवी भा. रा. तांबे, रेव्हरंड ना. वा. टिळक यांसारख्या प्रतिभावंत साहित्यिकांचा सहवास आणि मैत्री केशवसुतांना लाभली. केशवसुतांनी संस्कृत आणि इंग्रजी कवितांचे भाषांतर करून आपल्या काव्यलेखनाला प्रारंभ केला. विद्यार्थीदशेत केशवसुतांवर पाश्चात्य शिक्षण, पाश्चात्य साहित्य व पाश्चात्य तत्वज्ञान यांचा पगडा होता. केशवसतांनी अनेक प्रेमकविता, सामाजिक कविता, निसर्ग कविता लिहिल्या तर कांही गुढगुंजनात्मक कविताही लिहिल्या. इंग्रजी कवितेचे भाषांतर करीत असतांना त्या भाषेच्या वाड्.मयातील 'लव्ह लिरिक' ने केशवसुतांचे लक्ष वेधले. ऐहिक प्रेमाची महती इंग्रजी वाड्.मयात विशेष आहे. स्त्री व पुरूष हे कुटुंबाचे व समाजाचे घटक असल्याने परस्परांवरील त्यांच्या प्रेमास समाजात मान व महत्व असावे हे स्वाभाविक आहे. संस्कृत साहित्यात स्त्रीच्या शरीराची अलंकारिक वर्णने खूप आहेत, त्या मानाने तिच्या मनाचे वर्णन कमी आहे. शेक्सपिअरचे बरेचसे साहित्य स्त्री–पुरूष प्रेमसंबंधावर आधारलेले आहे.'कामांधत्व', 'काळ आणि प्रियेचे सौंदर्य', 'मरणानंतर' इ. केशवसुतांच्या कविता शेक्सपिअरच्या कवितांवरून अनुवाद केलेल्या आहेत. केशवसुतांनी काही कविता आपल्या पत्नीसाठी केलेल्या आहेत. 'प्रियेचे ध्यान', 'जरी तू हया येथे ' हया कविता रसिकांना प्रेमाच्या एका उत्कट पातळीवर नेवून ठेवतात. पत्नीचा निरोप घेताना ते म्हणतात –

'तुजविण मजला कांही असेना प्रिय या गे जगती
तूं मम जीवित ! तूं मम आत्मा !! तूं माझी शक्ती !!!'

केशवसुतांच्या कवितेत प्रेम हे प्रधान असले तरी त्याच्या वेगवेगळया छटा आहेत. केशवसुतांच्या ब–याचशा कविता या काल्पनिक असल्याने त्या सरस व रमणीय आहेत. केशवसुतांची 'प्रिती' ही कविता तत्वज्ञानात्मक आहे.

'प्रेम न बाडी ऊपजे प्रेम न हाट बिकाय
राजा परजा जेहि रूचे सीस देय ले जाय'

प्रेम वाडीत उगवत नाही, प्रेम बाजारात विकत नाही, राजा असो किंवा प्रजा असो ज्यास ते रूचत असेल त्याने आपले शिर कापून द्यावे आणि प्रेम न्यावे. गोविंदाग्रजांनी देखील आपल्या 'प्रेम आणि मरण' या कवितेत हेच सांगीतले आहे. कवी द्रष्टा असतो, जगदोध्दारासाठी त्याचा अवतार असतो, तो जनतेचा वाचस्पती आहे, तो देवाचा लाडका आहे, त्याच्या प्रतिभेला दिशांची आणि काळाची बंधने नाहीत या कल्पना केशवसुतांच्या कवितात निरनिराळया प्रकारांनी मोठया प्रभावाने प्रकट झाल्या आहेत. आपण काव्य लिहितो परंतु ते लिहिण्याची स्फूर्ती आपणांस 'शारदा' देते हे सांगतांना केशवसुत म्हणतात –

'काव्य लिहिले मी खरें परी मातें,
शारदेनें जो मंत्र दिला कानीं
तसे लिहिलें मीं य काव्य तिचें मानीं !
दिव्य शक्तीने स्फुरे गंध पुष्पी
रंग खुलतीही तिनें इंद्रचापीं !'

केशवसुतांना निसर्गाविषयी विशेष आपुलकी होती.निसर्गाच्या कुशीतच त्यांचे बालपण गेले. 'एक खेडे' आणि 'नैऋत्येकडील वारा' या त्यांच्या दोन कवितांत त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले व मनाने अनुभवलेले निसर्गचित्रण आहे. उंच उंच डोंगर, अचपळ ओढे, आकाशात डोकावणारी नारळी, पोफळी, ताडी आणि माडांची झाडे, अष्टौप्रहर किना–यांशी खेळणारा समुद्र यांनी केशवसुतांनी ठसठसीत आणि उठावदार रेखाचित्रे काढली आहे. ‘पुष्पाप्रत' या कवितेत केशवसुतांचे निसर्गपूजन आहे. फुलाला पाहून केशवसुतांना आपले निष्पाप व अव्याज बालपण आठवते. निसर्गपूजनाची ही पध्दती मराठी वाड्.मयात इंग्रजी वाड्.मयाच्या अध्ययनाने आलेली आहे. केशवसुतांना निसर्गाचा सहवास अतिशय प्रिय होता. ते म्हणतात ' जेथे ओढे वनराजी वृत्ती रमे तेथें माझी', केशवसुतांनी केवळ प्रतिमा म्हणून निसर्गाचा उपयोग केला नाही.

'भृंग','फुलपाखरू','पुष्पश्यांच्यापासून ते स्वतःला अलिप्त ठेवतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या काही कवितांत त्यांनी अत्यंत कलाकुशलतेने निसर्गाचा उपयोग पृष्ठभूमीसारखा करून घेतला आहे. 'सतारीचे बोल' आणि 'घुबड'या कवितांना त्यांनी रात्रीच्या वर्णनाची पार्श्वभूमी योजिली आहे, ती या दृष्टीने प्रेक्षणीय आहे. केशवसुतांच्या 'आहे जीवित काय', 'रांगोळी','तुझे नाम मुखीं' या कवितांत देवाच्या भक्तीचे निर्देश त्यांनी केले आहे.

'एक तुतारी द्या मज आणुनि !
फुंकिन जी मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिंच्या त्या किंकाळीने,
अशी तुतारी द्या मजलागुनि !'

'तुतारी' या कवितेत केशवसुतांनी देवांच्या मदतीला चालण्याकरीता मानवांना आवाहन केले आहे. 'झपूर्झा' त 'प्रकाश गेला ! तिमीर हरपला' अशा विदेही स्थितप्रज्ञाच्या मनःस्थितीचे दर्शन आहे. 'सतारी बोलां' त अद्वयानंदाचे वर्णन आहे. 'कोणाकडून ?कोणीकडे ?' या कवितेत जन्मपूर्व आणि जन्मोत्तर अवस्थांचे चिंतन आहे. 'म्हातारी' या कवितेत आत्म्याच्या सत्य स्वरूपाचे निवेदन आहे. या कवितांबरोबरच 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य', 'आहे जीवित काय ?' या कविताही तत्वज्ञानात्मक आहे.

केशवसुतांची प्रेमकविता भावमधुर व कोमल आहे. निसर्गविषयक कविता सहजसुंदर व कल्पनारम्य आहे. चिंतनपर तात्विक कविता गुढगुंजनात्मक

आहे. परंतु या सर्व कवितांपेक्षा त्यांच्या राष्ट्रीय व सामाजिक कविता विशेष नावाजलेल्या आहेत. 'नवा शिपाई', 'गोफण', 'मूर्ति भंजन', 'पण लक्षांत कोण घेतो', 'कवितेचे प्रयोजन','स्फुर्ति', 'तुतारी' या कवितांतून केशवसुतांचा सामाजिक दृष्टिकोन लक्षात येतो. केशवसुतांच्या काही कविता वैयक्तिक स्वरूपाच्या आहेत. आईवडील, जन्मभूमी यांच्यावरील प्रेम अभिव्यक्त करणा—या आहेत.

केशवसुतांच्या आगोदर मराठी कविता ही मुख्यतः पारलौकिकाशी निगडित होती. केशवसुतांची व त्यांच्या नंतरची कविता ऐहिकाशी आणि मानवी मनाशी जोडली गेली. मराठी कवितेतील ही क्रांती मूलभूत स्वरूपाची होती आणि म्हणूनच केशवसुतांनी क्रांतीकारक हवी असेही म्हटले जाते. “ कविता म्हणजे आकाशाची वीज आहे. ती धरू पाहणारे शेकडा नव्याण्णव आपणास होरपळून घेतात. मी अशा नव्याण्णवापैकीच एक आहे.” अशी लोकविलक्षण काव्यधारणा असलेले केशवसुत आपल्या साहित्य कर्तुत्वामुळे अवघ्या मराठी विश्वाच्या गळयातील ताईत झाले. केशवसुतांना फार कमी कमी आयुष्य लाभले आणि जे आयुष्य लाभले तेही फार सुस्थिर होते असे म्हणता येणार नाही. शिक्षण आणि नोकरीसाठी त्यांना सतत भटकंती करावी लागली. वयाच्या अवघ्या चाळीसाच्या वर्षी प्लेगने हुबळी येथे 7नोव्हेंबर 1905 रोजी केशवसुतांचे निधन झाले.

***संदर्भ :–***

1.पंडित भ. श्री. (संपादक) समग्र केशवसुत, व्हीनस प्रकाशन, पुणे– 30
2.बेडेकर दि. के., केशवसुतांची काव्यदृष्टी
3.भेंडे सुभाष (डॉ) आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार चरित्रकोश, खंड 2, साहित्य

